महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ १८४ /२०२३ मेट्रो ४ दि. २३/१०/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यक्षेत्रात कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. कंपनी कडून **कासारवडवली जंक्शन ते वेदांत हॉस्पिटल दरम्यान यु गर्डर टाकते वेळी** ठाणे कडून घोडबंदर रोडचे दिशेने जाणारी वाहिनी जड अवजड वाहनांकरीता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) घोडबंदर ठाणे वाहिनी वरील पिलर नं. ०४ ते ०५ वर यु गर्डरचे काम करताना ठाणेच्या दिशेने जाणा–या सर्व जड, अवजड वाहनांना **पिलर नं. ०९ जवळ वेदांत हॉस्पिटल समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने पिलर नं. ०९ ते १० च्या गॅप मधून ठाणे घोडबंदर वरील एक लेन वरून विरूध्द दिशेने पुढे पिलर नं. १९७ ते १९६ च्या गॅप मधून घोडबंदर ठाणे वाहिनी मार्गे इच्छित स्थळी जातील.

अ) घोडबंदर ठाणे वाहिनी वरील पिलर नं. ०४ ते ०५ वर यु गर्डरचे काम करताना जड अवजड वाहने सोडून इतर वाहने ऑस्कर हॉस्पिटल कट येथून सेवा रस्त्याने पुढे कासारवडवली सिग्नल येथून मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

ब) घोडबंदर ठाणे वाहिनी वरील पिलर नं. ०१ ते ०५ वर यु गर्डरचे काम करताना जड अवजड वाहनांसाठी मुख्य रस्त्यावरील एक खुली असणार आहे व हलकी वाहने ही पेट्रोल पंप कट येथून सेवा रस्त्याने पुढे वेदांत हॉस्पिटल कट येथून मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

१) दि. २३/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २४/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत
२) दि. २५/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २६/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत
३) दि. २६/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २७/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत
४) दि. २७/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २८/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत
५) दि. २८/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २९/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत
६) दि. २९/१०/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. ३०/१०/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजे पर्यंत

सदरची वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान यु गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner